



दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २७३ वा सोमवार दि १२ जानेवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# डोंगर खंडाळा १४ एकर जमीन प्रकरणातील गुंता...

## नियमबाह्य खरेदी,बनावट कागदपत्रे तक्रारकर्त्यांची न्यायासाठी प्रशासनाकडे धाव संबंधित अधिकारी गप्प का?

## सिद्धार्थ भंडारे उपजिल्हाधिकारी पुणे विभाग तथा ओएसडी सामाजिक न्यायमंत्री

**जनसंचलन/बुलढाणा**

डोंगर खंडाळा येथील सामूहिक १४ एकर जमीन खरेदी प्रकरणात नियमबाह्य प्रकार उघडकीस येत असून,महसूल व नोंदणी विभागासह पोलीस प्रशासन अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.सामाईक सातबाऱ्यातील जमिनीची खरेदी करताना बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी सातबाऱ्यावर खोटी नोंद केल्याचा आरोप असून,त्या नोंदींवर हरकत असतानाही खरेदी प्रक्रिया पुढे रेटण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे. या खरेदीसाठी नियमानुसार आवश्यक असलेली संपूर्ण माहिती व कागदपत्रे सादर न करता,अर्धवट व कथित बनावट कागदपत्रांच्या आधारे व्यवहार पूर्ण करण्यात आल्याचा आरोप तक्रारकर्ते राहुल मिननाथ तारे व त्यांच्या परिवाराने केला आहे.यासंदर्भात त्यांनी जिल्हा उपनिबंधक कार्यालयात वारंवार पत्रव्यवहार करून आक्षेप नोंदवले. मात्र,या आक्षेपांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. इतकेच नव्हे तर ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या तक्रारींवर आजतागायत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. प्रश्न असा आहे की, स्पष्ट पुरावे, लेखी तक्रारी





आणि अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाचे दाखले असतानाही प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी गप्प का आहे? या संपूर्ण प्रकरणाला अधिक गंभीर वळण मिळाले आहे कारण दिलेल्या तक्रारीत सिद्धार्थ भंडारे, उपजिल्हाधिकारी (पुणे विभाग) तसेच सामाजिक न्याय मंत्री ना. संजय शिरसाट यांचे ओएसडी यांचा समावेश असल्याचे नमूद करण्यात आले आहे.त्यामुळेच काही दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. १४ एकर जमीन प्रकरणात नेमकी कोणाची पाठराखण सुरू आहे? कायद्याच्या वर अधिकारी आहेत का? की राजकीय वजनामुळे नियम पायदळी तुडवले जात आहेत? आता या प्रकरणात वरिष्ठ स्तरावरून तातडीने चौकशी होणार का,की सत्य कायमच कागदातच गाडले जाणार हा सवाल जनतेतून उपस्थित होत आहे.तक्रारकर्ते न्यायासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडे सतत पत्र व्यवहार करीत असून तक्रारीत उपजिल्हाधिकारी तथा (ओएसडी) सिद्धार्थ भंडारे यांची चल अचल संपत्तीची उच्चस्तरीय चौकशी करून मला व माझ्या परिवाराला न्याय मिळवून द्यावा अशी दिलेल्या तक्रारीत तारे परीवार मागणी करीत आहे. तारे परिवाराला जो पर्यंत न्याय मिळत नाही आम्ही आमच्या बातमीपत्रातून दिलेल्या पुराव्यांच्या आधारावर प्रशासनाकडे हा विषय लावून धरू जो कोणी या प्रकरणात दोषी आढळेल त्यावर कडक कारवाई होत नाही हे सत्र असेच सुरू राहणार

अजून बरेच काही पुढील भागात..

---

# दलालांचा सुळसुळाट,प्रामाणिक अधिकाऱ्यांचा छळ!

## चिखली उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात दलालराज उघड...



**जनसंचलन/ चिखली**

येथील उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात दलालांचा उघड उच्छाद सुरू असल्याचा गंभीर आरोप भूकरमापक अभय रमेश पाटील यांनी केला असून, या प्रकरणाने महसूल प्रशासनातील सडलेली यंत्रणा पुन्हा एकदा उघडी पाडली आहे. तब्बल ८ वेळा तक्रारी करूनही कारवाई शून्य असल्याने प्रशासन नेमके कुणाच्या दबावाखाली आहे, असा थेट सवाल उपस्थित होत आहे. कार्यालयात दिवसभर ठाण मांडून बसणारे दलाल शेतकरी व दिव्यांग नागरिकांना बसायला जागा देत नाहीत, कर्मचाऱ्यांच्या खुर्च्यांवर बसतात, अभिलेख कक्षात बिनधास्त प्रवेश करतात ही धक्कादायक बाब तक्रारीत नमूद आहे. मोजणी व नकाशा कामासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांकडून कार्यालयाच्या नावाने पैसे उकळले जात असल्याचा आरोप असल्याने विभागाची प्रतिमा मलीन होत आहे. दिनांक २९/११/२०२४ रोजी दलालांकडून फोनवर धमक्या, कार्यालयात वादविवाद, आमदारांचे नाव वापरून राजकीय दबाव हे सर्व प्रकार घडूनही संबंधितांवर एकही ठोस कारवाई नाही. उलट तक्रारदार अधिकारी अभय पाटील यांनाच त्रास देण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोप आहे. तीन पदांचा एकाच वेळी पदभार, कारणे दाखवा नोटिसा हा सारा प्रकार म्हणजे दलालांना मोकळे रान आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांना दडपशाही नव्हे काय? या गैरप्रकारांबाबत वर्तमानपत्रांत वारंवार बातम्या येऊनही वरिष्ठ अधिकारी गप्प का? आपले सरकार पोर्टलवरील तक्रारी मोघम उत्तर देऊन निकाली काढल्या जात असतील तर ही संगनमताचीच कबुली नाही का, असा सवाल आता जनतेतून उपस्थित होत आहे.

# कायद्याच्या हातांपलीकडचे!

महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाचे मंत्री व आमदार यांच्या वागण्या-बोलण्याने मध्यंतरी चांगलाच गदारोळ माजला. त्याची सर्वत्र चर्चा झाली. एक मंत्री सभागृहात भ्रमणध्वनीवर एक खेळ खेळत आहेत, असा आरोप चित्रणासकट झाला. एका मंत्रिपुत्राच्या आईच्या नावाने डान्सबार परवाना आहे, याचाही उल्लेख झाला. एका मंत्र्याच्या मुलाने मालमत्तेच्या लिलावात घोटाळा केला, असाही आरोप झाला. यात फक्त पत्ते खेळणाऱ्या मंत्र्यांचा खातेबदल झाला; पण त्या मंत्र्यांची बडतर्फी झाली नाही. याशिवायच्या इतर प्रकरणांत तर तेही झाले नाही. एका आमदाराने आमदार निवासातील उपाहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली. त्याचेही चित्रण होते. त्यावरून चांगलीच टीका झाली. मात्र, ही टीका झाल्यानंतरही त्या आमदाराला सदनात व सदनाबाहेर कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागले नाही. यापुढेही त्याला कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागणार नाही, असा मतप्रवाह आहे. त्या घटनेचे चित्रण झाल्यावरही गुन्हा दाखल झाला नाही. कदाचित चौकशी होणार असेल, किंवा प्रलंबित असेल. मात्र, उच्चपदस्थांच्या, सत्ताधाऱ्यांच्या गैरकृत्यांना आळा बसेल असे ठोस काही न केल्यामुळे समाजात चुकीचा संदेश गेला, हे लक्षात घ्यायला हवे. ही सारी प्रकरणे, घटना पाहिल्या तर, कायद्यासमोर सारे समान आणि कायद्याचे साऱ्यांना समान संरक्षण या तत्त्वाला बगल दिली गेली व ही अशी बगल दिली जाते. एरवी साधी किंवा गंभीर दुखापत, कामात अडथळे आणणे, हालचालीस प्रतिबंध करणे, अपाय करणे अशी कृत्ये ऐच्छिक किंवा मुद्दामहून केली असतील तर भारतीय न्यायसंहितेप्रमाणे त्यांस गुन्हे असे संबोधले जाईल. आमदार महोदयांनी उपाहारगृहात येऊन, तेथील कर्मचाऱ्याला मारहाण करून जमिनीवर पाडले, असे चित्रणात दिसले. ङ्गहे जे चित्रण दिसते ते खरे नाही वा त्यातील व्यक्ती मी नाहीफ असे आमदार महोदयांनी म्हटले नाही. त्या कर्मचाऱ्याने तक्रार दिली की नाही, याने फरक पडत नसतो. वाहिन्यांवरील चित्रण पाहून स्थानिक पोलिसांनी तेथे जाऊन चौकशी आणि शहानिशा करणे, त्या कर्मचाऱ्याची दुखापत कशा प्रकारची आहे, याचा वैद्यकीय अहवाल प्राप्त करणे, पीडिताची जबानी नोंदवणे या अपेक्षित आणि स्वाभाविक बाबी असतात. आमदार महोदय याला अपवाद कसे ठरतात, हे आजवर उलगडले नाही. ङ्ग अदखलपात्र गुन्हा म अशी नोंद झाली असे कळते. याचा अर्थ आम्ही दखल घेणार नाही, पीडिताला वाटल्यास तो न्यायालयात खासगी तक्रार करू शकतो. दखलपात्र किंवा अदखलपात्र हा फैसला आम्हीच करणार, दुखापत साधी की गंभीर हेही आम्हीच ठरविणार; कारण आम्ही सत्ताधारी आहोत. तटस्थ, संवेदनशील, स्वतंत्र यंत्रणांना त्यांचे काम करू द्यायचे नाही व प्रकरण मिटले असे दाखवायचे. मग दिलगिरीलाही अर्थ राहत नाही. आमदार महोदय म्हणतात, की अन्नपदार्थांचा दर्जा चांगला नसेल व ते खराब, शिळा असतील तर मी पुन्हा असाच वागेन. अन्नपदार्थांच्या बाबतीत तेच सगळे निर्णय घेणार. या मग्रुरीला शिक्षा नसते असेच सामान्यांना वाटणार. मात्र, साधारण व्यक्तीने ही कृती केली असती तर त्याला व सगळ्यांनाच पोलिसी खाक्या दिसला असता. अशा साधारण व्यक्तीला कदाचित काही दिवस कोठडीत काढावे लागले असते. पीडित कर्मचाऱ्याने काय केले, वा करायचे ठरवले हे ज्ञात नाही. मुख्यमंत्र्यांकडून कडक पावले उचलली जातील, ही शाश्वती नाही. आमदाराला व मंत्र्यांना समज मिळाली, हेही नसे थोडके. मुख्यमंत्र्यांनी सदनातील आपल्या भाषणात लोकप्रतिनिधींच्या वागण्या-बोलण्याचे वाभाडे काढले; परंतु राज्याचे गृहमंत्री म्हणून पीडिताला संरक्षण देण्याचे आश्वासन त्यांनी दिले नाही. त्या पीडिताला गृहमंत्र्यांकडून किंवा त्यांच्या खात्याकडून दिलासा नाही. त्याच्या कायदेशीर अधिकारांचे भान नसणारे, त्याबाबत असंवेदनशील असणारे गृहखाते जनतेला आपले कसे वाटणार, हा खरा प्रश्न आहे. शासनाच्या व्यवहारात असा ठळक भेदभाव का दिसतो? कायद्याची अंमलबजावणी करताना सरकारचा विभाग हा सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाचा नसतो, हे ध्यानात घ्यायला हवे. सत्तेत असलेला पक्ष बदलत जाईल. मात्र, शासकीय अधिकारी, विभागप्रमुख हे कायमस्वरूपी पद असते. सरकार म्हणजे कार्यपालिका, आणि तिची बांधिलकी फक्त कायदा आणि राज्य घटनेशी असते. सत्तेत असलेला पक्ष व त्या सत्ताधारी पक्षाचे मंत्री हे अधिकाऱ्यांच्या कामात ढवळाढवळ करतात आणि अधिकारी देखील ते खपवून घेतात. कायद्याच्या कक्षेत येणारी कारवाईही गृह विभाग करत नाही किंवा त्याचा कारभार सांभाळणारा मंत्री अधिकाऱ्यांना कह्यात ठेवतो. आमदाराच्या प्रकरणात गृह खात्याने काय कुठली चौकशी केली, त्याचा अहवाल तयार केला का व तो कधी व कोणाला सादर केला याचा तपशील लोकांसमोर नाही. भारतीय न्याय संहितेतील अदखलपात्र गुन्हेच संबंधित आमदाराच्या हातून घडले, हा निष्कर्ष कशावर आधारित आहे हे कळेल का? लोकप्रतिनिधी आमदार निवासातील उपहारगृहाच्या कर्मचाऱ्यांना नुसता दटावत नव्हता, तर सर्वांदेखत शिवीगाळ, मारहाण इत्यादी करत होता. इतके सारे असूनही दखलपात्र गुन्हा घडत नाही, हे पटत नाही. लोकप्रतिनिधींना विशेष स्थान व संरक्षण नवीन संहितेत देण्यात आले आहे का, आणि तरतुदींचा असा अन्वयार्थ सत्ताधारी व विरोधी असा फरक करू देणार नाही. मग जागेचा, ठिकाणाचाही प्रश्न नाही; कारण असे वर्तन उद्या मंत्रालयातील, विधिमंडळातील व विश्रामगृहातील वा खासगी उपाहारगृहात केले तरी कुठलीच कारवाई करता येणार नाही वा होणार नाही. जे आमदार निवासाच्या आवारात चालते तेच शासकीय कार्यालये आणि इतर आस्थापनांत चालवावे लागेल. मनाजोगे उत्तर किंवा अपेक्षित खुलासा मिळत नसतो तेव्हा शाई फ`कणे, लाथा मारणे, तोंडाला काळे फासणे इत्यादी महाराष्ट्राला नवे नाही. नेते, कार्यकर्ते कोणाची भीती न बाळगता असे करीत असतात. एकदा का आपला पक्ष व आपले कार्यकर्ते, आपली ङ्गयुतीफ व ङ्गआघाडीफतील साथीदार व सहकारी यांना मोकळे रान देण्याचे ठरले की मग पक्ष पातळीवरही कारवाई करता येणार नाही. शिस्तभंग सत्तेवरील सहकारी पक्षाच्या नेत्याचा असेल तर मी काहीच करणार नाही; कारण असे माझ्या पक्षाच्या बाबतीत घडले तर मग हालचाल करावीच लागेल. युती-आघाडीचा हा धर्म सत्ताधारी व विरोधक दोघेही पाळतात व पाळतील. याला लोकांचाही आक्षेप नाही असे म्हणायचे, कारण ते आम्हाला वारंवार निवडून देतात. पुढारी हे विसरतात की निवडून मतदार देतात. लोक / जनता त्यांच्या पलीकडेही असते. ङ्गलाडकाफ किंवा ङ्गलाडकीफ असे काही नसते. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की ङ्गनिवडणुकीतले यश हा घाण झाकण्याचा किंवा सत्ताउपभोगाचा परवाना नव्हे.फ (शिवनंदन पासवान वि. बिहार सरकार (१९८३) १ सुप्रीम कोर्ट केसेस ४३८ परिच्छेद २०). लोकांना कस्पटासमान समजायचे असे ठरविल्यावर बेताल, बेजवाबदार वर्तनाला व वक्तव्याला कारणीभूत असलेल्यांना काढण्याचा प्रश्नच नाही. मग गंभीर आरोप असलेल्यांनाही सुरक्षित ठेवावे लागते. सारांश काय की, वेगळा पायंडा पाडला तर पंचाईत होईल. पत गेली तरी सत्ता टिकविण्याची अपरिहार्यता विधिमंडळाची, आपल्या राज्याची प्रतिमा डागाळेल याचेही वैषम्य वाटत नाही. हीच खरी शोकांतिका.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# मुंबई महापालिका निवडणुकीत उमेदवारांकडून नवा फंडा; डमी मतदानामुळे अनेकांची झोप उडाली...

वृत्तसंस्था/मुंबई

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी आता काही दिवस शिल्लक राहिले असतानाच जवळपास सर्वच राजकीय पक्षांकडून उमेदवारांना मिळणाऱ्या मतांचा अंदाज घेण्यासाठी डमी मतदाना च्या कल्पनेचा वापर केला जात आहे. यानुसार संबंधित मतदारांना त्यांच्या व्हॉटसॲप मेसेज, ई-मेल किंवा ङ्गएसएमएसफच्या माध्यमातून ङ्गडमी मतदानाफसाठी लिंक दिली जात असून, या लिंकमध्ये ऑनलाइन ईव्हीएम मशिनची प्रतिकृती उपब्लध करून देण्यात आली आहे. ज्या उमेदवाराकडून ही लिंक दिली जाते त्याच्या नावासमोरील बटण दाबल्यानंतर मतांची नोंद केली जाते. मुख्य म्हणजे, मत नोंदवल्यानंतर व्हीव्हीपॅटचीही प्रतिकृती दाखविण्यात येत असून, मतदारांचे मत नोंदवले गेल्याचा एक ऑडिओही ऐकविला जातो. डमी मतदानाची ही प्रक्रिया सध्या राजकीय वर्तुळात प्रचंड व्हायरल होत आहे. या डमी मतदानाच्या माध्यमातून संबंधित मतदारांना व्हॉटसॲप, फेसबुकच्या माध्यमातून एक लिंक पाठवली जाते. लिंकमध्ये उमेदवारांना निवडणूकआयोगाकडून ज्या क्रमांकाचे आणि चिन्हाचे वाटप करण्यात आले आहे, त्याची सविस्तर माहिती ईव्हीएमच्या प्रतिकृतीवर दिली आहे. या मशिनवर संबंधित उमेदवारांच्या नावापुढील बटण दाबल्यास ईव्हीएमवर ज्याप्रमाणे बीपचा आवाज येतो तसा



आवाजही ऐकू येतो. त्यानंतर व्हीव्हीपॅटवर येणारी स्लीप दिसते व आपल्या मतदानाची माहिती मिळते. प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्याची माहिती उमेदवारांपर्यंत पोहोचवण्यासाठी एक सुविधा दिली आहे. त्यानुसार पूर्ण केलेली डमी मतदानाची सर्व माहिती उमेदवारांपर्यंत पोहोचविली जात असून, मतदारांच्या कलाचा अंदाज घेण्याचे काम संबंधित उमेदवार आणि त्यांच्या चमूकडून केले जात आहे. या डमी मतदानाच्या प्रक्रियेने मुंबईतीलअनेक उमेदवारांची झोप उडविली असल्याची माहिती पक्षातील सूत्रांनी दिली. या डमी मतदानात अनेक उमेदवारांना कमी प्रतिसाद मिळत आहे, त्यामुळे निवडणुकीत आपला निभाव लागणार की नाही, या चिंतेने अनेक उमेदवारांना ग्रासले आहे. या डमी मतदानातील मतदानाची आकडेवारी लक्षात घेता संबंधित उमेदवारांकडून त्यानुसार प्रचाराची रणनीती आखली जात असल्याची माहितीही सूत्रांनी दिली.

## उमेदवारी मागे घेणारा मनसेचा शिलेदार भाजपात, मोठा मित्रही लवकरच धक्का देणार?

वृत्तसंस्था/ डोंबिवली

डोंबिवली पश्चिमेकडील चाळींचा झोपडपट्टी पुनर्विकास किंवा समूहविकासाच्या माध्यमातून विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असून विकासासाठी महायुतीला मतदान करा,फ असे आवाहन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी डोंबिवली पश्चिमेकडील कार्यकर्ता मेळाव्यात केले. भाजप उमेदवार महेश पाटील यांच्या विरोधात उमेदवारी मागे घेणारे मनोज घरत यांनी यावेळी कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. डोंबिवली पश्चिमेकडील प्रभाग क्रमांक २२ मधील शिवसेना-भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी ही सभा घेण्यात आली होती. ङ्गआपला मोठा मित्रदेखील लवकरच आपल्याबरोबर असेल,फ असे सूचक विधान प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी माजी आमदार राजू पाटील यांचे नाव न घेता केले. डोंबिवली पश्चिमेकडे कोकणीबहुल वस्ती असून या मतदारांना आकर्षित करण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांनी प्रचाराची धुरा कोकणी कार्यकर्त्यांवर सोपविली आहे. ङ्गडोंबिवली पश्चिम हा भाग उत्सवप्रेमी असून प्रत्येक मतदाराने चारही उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. तुमचे मतदान हे विकासाला असून भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी मतदान करा,फ असे आवाहन चव्हाण यांनी कार्यकर्ता मेळाव्यात केले चाळी, धोकादायक घरांमध्ये राहणाऱ्या प्रत्येकाला हक्काचे घर केवळ महायुतीच देऊ शकते, चाळींचा विकास क्लस्टरच्या माध्यमातूनच करणे शक्य आहे. मुंबईच्या धर्तीवर क्लस्टर योजना या शहरातदेखील राबवली जाईल,फअसे आश्वासन त्यांनी मतदारांना दिले. चर्चा अनेक असतात. मात्र मित्र बरेच दिवस वेगवेगळे राहू शकत नाहीत. यामुळेच आमचे अनेक वर्षांचे मित्र असलेले मनसे शहराध्यक्ष मनोज घरत यांनी आज मित्रत्वाच्या नात्याने भाजपमध्ये प्रवेश केला. मोठा मित्र लवकरच येईल. आपली मैत्री राजकारणाच्या पलीकडील असून हे नाते टिकविण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे,असे ते म्हणाले. दुसरीकडे, शिवसेना उबाठा पक्षाचे माजी आमदार दगडू सकपाळ यांनी रविवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी लालबाग-परळ या बालेकिल्ल्यातील शेकडो पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा झेंडा हाती धरला. हा शिवसेना उबाठा पक्षासाठी एक धक्का मानला जात आहे.

## लालबाग-परळ, शिवडीत ठाकरेंसाठी धोक्याची घंटा? बालेकिल्ल्यात उलटफेर...

जनसंचलन/दुसरबीड

मुंबई : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी आमदार दगडू सकपाळ यांनी रविवारी अखेर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी लालबाग-परळ या बालेकिल्ल्यातील शेकडो पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला असून हा शिवसेना उबाठा पक्षासाठी एक धक्का मानला जात आहे. शिंदे यांच्या नंदनवन या सरकारी निवासस्थानी सकाळी ११ वाजता हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. अलिकडेच शिवडीमधील प्रचार रॅलीदरम्यान एकनाथ शिंदे यांनी सकपाळ यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली होती. त्यानंतर सकपाळ यांच्या पक्षांतरांच्या चर्चेला सुरुवात झाली होती. दरम्यान, या पक्षप्रवेशानंतर उपस्थितांना संबोधित करताना दगडू दादा सकपाळ अत्यंत भावूक झाले होते. ङ्गमी आयुष्याची ५९ वर्षे एकाच घरात काढली. बाळासाहेबांच्या विचाराने आम्ही घडलो. मात्र, गेल्या काही काळापासून तिथे निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलले जात आहे. ज्येष्ठ नेत्यांचा सन्मान उरलेला नाही. ज्या पक्षात विचारांची किंमत नाही, तिथे राहणे कठीण झाले होते. आज



इथून बाहेर पडताना माझ्या छातीवर दगड ठेवावा लागला आहे, कारण हे नाते तोडणे सोपे नव्हते. पण एकनाथ शिंदे हे बाळासाहेबांचे विचार पुढे नेत आहेत आणि इथेही धनुष्यबाणच आहे, म्हणून मी हा मार्ग निवडला,फ असेही सकपाळ म्हणाले. एकनाथ शिंदे यांनी दगडू सकपाळ यांचे स्वागत करताना उद्धव ठाकरे यांच्या कार्यपद्धतीवर सडकून टीका केली. ङ्गआजचा दिवस शिवसेनेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. दगडू सकपाळ हे शिवसेनेच्या पायरीचा भक्कम दगड आहेत. ज्यांनी स्वतःच्या घरादारावर तुळशीपत्र ठेवून, अंगावर लाठ्या-काठ्या झेलून शिवसेना लालबाग-परळमध्ये जिवंत ठेवली. आज त्यांनाच अपमानित होऊन पक्ष सोडावा लागत आहे. उद्धव ठाकरे यांना अशा निष्ठावंतांची किंमत उरलेली नाही. पायाचा दगड निखळतो, तेव्हा इमारत कोसळायला वेळ लागत नाही. दगडूदादांच्या रूपाने लालबागच्या राजाचा आशीर्वाद आज आम्हाला मिळाला आहे, असेही ते म्हणाले. एकनाथ शिंदे यांनी दगडू सकपाळ यांचे स्वागत करताना उद्धव ठाकरे यांच्या कार्यपद्धतीवर सडकून टीका केली. ङ्गआजचा दिवस शिवसेनेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. दगडू सकपाळ हे शिवसेनेच्या पायरीचा भक्कम दगड आहेत. ज्यांनी स्वतःच्या घरादारावर तुळशीपत्र ठेवून, अंगावर लाठ्या-काठ्या झेलून शिवसेना लालबाग-परळमध्ये जिवंत ठेवली. आज त्यांनाच अपमानित होऊन पक्ष सोडावा लागत आहे. उद्धव ठाकरे यांना अशा निष्ठावंतांची किंमत उरलेली नाही. पायाचा दगड निखळतो, तेव्हा इमारत कोसळायला वेळ लागत नाही. दगडूदादांच्या रूपाने लालबागच्या राजाचा आशीर्वाद आज आम्हाला मिळाला आहे,फ असेही ते म्हणाले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मामाच्या मुलाचं लग्न लागलं, घरी येताना कुटुंबावर काळाचा घाला

## पतीसह, पत्नी आणि मुलगीही ठार..



**कोल्हापूर :** जालना: जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील महाकाळ फाट्यावर छत्रपती संभाजीनगर ते सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावर काल सायंकाळी ७:३० वाजेच्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. भरधाव कंटेनरने २ दुचाकींना पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या या अपघातात दुचाकीवरील एकाच परिवारातील पती-पत्नी, मुलगी हे ठार झाले तर दुसऱ्या दुचाकीवरील पती-पत्नी गंभीर जखमी झाले आहेत.यासंदर्भात अधिक माहिती अशी की, विकास अन्नासाहेब जाधव (वय २८) हे पत्नी साक्षी (वय २३) आणि मुलगा अथर्व (वय ४ सर्व रा. रोहीलागड ता. अंबड, ह. म. शहानगर चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर) हे उमापुर (ता. गेवराई, जि. बिड) येथे मामाच्या मुलाचे लग्न लावून दुचाकीने (एमएच २०-एचसी ३०१३) घराकडे जात होते. दरम्यान, शहागड-वडीगोद्री रस्त्यावर महाकाळा फाट्याजवळ भरधाव कंटेनरने (एनएल ०१-जी९३२२) समोर चाललेल्या दोन दुचाकींना पाठीमागून जोराची धडक दिली. यावेळी कंटेनरने दूरपर्यंत या दोन्हीही दुचाकींना फरफटत नेल्या. अपघातस्थळी उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी व काही वाहनचालकांनी वाहन थांबवत या कंटेनरला थांबवले, मात्र तोपर्यंत कंटेनर चालकाने घटनास्थळावरून पोबारा केला होता. यावेळी नागरिकांनी दुचाकीवरील जखमींची पाहणी केली असता तिघेही मृत अवस्थेत आढळून आले. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार मयत साक्षी जाधव या गरोदर होत्या. दुसऱ्या दुचाकीवरील (एमएच १६-सीएल ९७३७) संतोष बनसोडे (वय २९), त्यांची पत्नी मोनिका (वय २५, रा. वळदगाव, जि. छत्रपती संभाजीनगर) हे या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर मयत साक्षी जाधव आणि अथर्व यांच्या मृतदेहाचे पाचोड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. तसंच मयत विकास जाधव यांच्यासह जखमींना छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

दरम्यान, या भीषण घटनेनंतर राष्ट्रीय महामार्गावर दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली होती. घटनास्थळी गोंदी ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक किरण हवाले, जमादार रामदास केंद्रे, दिपक भोजने आणि महाकाळा येथील ग्रामस्थांनी कंटनेरखालील मयतांना जेसीबीच्या साह्याने बाहेर काढण्यासाठी मदत केली. तसेच खोळंबलेली वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांना एक ते दीड तास कसरत करावी लागली आहे. काही क्षणातच एक हसतं खेळतं कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## दीड वर्षांच्या लेकीला विष दिलं अनब पती-पत्नीने आयुष्य संपवलं

**रांची :** आपल्या दीड वर्षांच्या लेकीला आपल्याच हाताने विष देत तिचा जीव घेतला. त्यानंतर पती - पत्नीनेही विष प्राशन करत आपल्या आयुष्याची अखेर केल्याची दु:खद घटना समोर आली आहे. ही भयंकर घटना झारखंडमधील धनबाद येथील जोगता पोलीस स्टेशन परिसरात घडल्याची माहिती समोर आली आहे. येथील एकाच कुटुंबातील तिघांच्या मृत्यूने परिसरात एकच खळबळ माजली आहे.धनबाद येथील एकाच कुटुंबातील तिघे पती, पत्नी आणि त्यांची दीड वर्षांची मुलगी यांनी विष प्राशन करून आपलं आयुष्य संपवलं आहे. या पती-पत्नीने आपला जीव देण्यापूर्वी आपल्या मुलीला विष दिल्याचं सांगितलं जात आहे. मृतांची ओळख राजा मियाँ, त्यांची पत्नी अमिना परवीन आणि त्यांची दीड वर्षांची मुलगी मायरा परवीन अशी झाली आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, कौटुंबिक वादातून या पती-पत्नीने लेकीला विष देत आयुष्याची अखेर केल्याचं वृत्त आहे. स्थानिक रहिवाशांकडून माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि तिघांनाही तातडीने धनबादच्या एनएमसीएचमध्ये नेले. मात्र, तोपर्यंत खूप उशिर झालेला होता.

# झुंड चित्रपटातील अभिनेता रवीसिंग छेत्री याचा निर्घृण खून



**नागपूर :** नागराज मंजुळे यांच्या 'झुंड'चित्रपटातील बाबू छत्री या भूमिकेने प्रकाश झोतात आलेला अभिनेता प्रियांशू उर्फ बाबू रवीसिंग छेत्री ऊर्फ बाबू छत्री (वय २१ रा. लुंबिनीनगर) याचा निर्घृण खून करण्यात आला. ही थरारक घटना जरीपटका पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नारा परिसरातील ओमसाईनगर येथील निर्माणाधीन इमारतीत घडली. या घटनेनं पोलिसांमध्ये खळबळ उडाली आहे. पैशाच्या वादातून मित्रानेच त्याला संपिवल्याचं तपासादरम्यान पुढं आलं आहे. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून मारेकरी बाबूच्या मित्राला अटक केली. ध्रुव उर्फ द्रुप शाहू (वय २०, रा. नारा), असं अटकेतील मारेकऱ्याचं नाव आहे. बाबू व ध्रुवला गांजा व दारूचं व्यसन आहे. बाबू याच्याविरूद्ध चोरीचे गुन्हे दाखल आहेत. लोहमार्ग पोलिस दलातही त्याच्याविरूद्ध गुन्हे दाखल आहेत.

ध्रुव व बाबूमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पैशासाठी वाद सुरू होता. काही दिवसांपूर्वी दोघांमध्ये हाणामारीही झाली. या हाणामारीनंतर बाबू आपल्याला ठार मारेल, अशी भीती ध्रुव याला होती. काल मंगळवारी रात्री बाबू हा दारू पिवून घरी झोपला होता. रात्री ध्रुव त्याच्या घरी आला. त्याला उठविले. त्यानंतर ध्रुव हा मोटारसायकलने बाबूला घेऊन निर्माणाधीन इमारतीत गेला.

तेथे दोघांनी दारू व गांजा प्यायला. त्यानंतर दोघांमध्ये पैशावरून वाद झाला. वाद विकोपाला गेला. संतप्त ध्रुवने चाकूने बाबूच्या शरीरावर वार केले. बाबू गंभीर जखमी झाला. ध्रुव तेथून पसार झाला. दरम्यान, परिसरातील नागरिकांना बाबू हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. नागरिकांनी पोलिसांना माहिती देत त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉक्टरांनी तपासून बाबूला मृत घोषित केले. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून ध्रुव याचा शोध सुरू केला. ध्रुव हा नारा परिसरातील झुडपात मद्यधुंद अवस्थेत पोलिसांना दिसला. पोलिसांनी त्याला अटक केली.

# गाडीला कट लागल्याने एकाला संपवलं; आरोपींसाठी पोलिसांनी सापळा रचला अनब..

**नागपूर :** गाडीचा कट लागल्याने दोघांनी मारहाण करून योगेश व्यंकटराव झोडे रा. देवळी गुजर याची हत्या केली. ही घटना बुटीबोरीतील कोलार येथे घडली. याप्रकरणी बुटीबोरी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून दोन मारेकऱ्यांना अटक केली. आदित्य वीरेंद्र बेले (वय २८ रा. दसरा रोड, महाल) व हिमांशू रमेशचंद्र गुप्ता (रा.गणेशनगर, न्यू कळमना), अशी अटकेतील मारेकऱ्यांची नावे आहेत. योगेश हा मालवाहू वाहनाने श्रमिकांची ने आण करण्याचे काम करायचा.

३० सप्टेंबरला सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास तो गाडीने बुटीबोरीकडे येत होता. कोलार परिसरात योगेशच्या गाडीचा कट आदित्यचा गाडीला लागला. दोघांनी त्याला थांबविले. त्याला जबर मारहाण केली व पसार झाले. नागरिकांनी त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी बुटीबोरी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. आदित्य व हिमांशूने मारहाण




केल्यानं त्याचा मृत्यू झाल्याचं समोर आलं. बुटीबोरी पोलिसांनी मंगळवारी खुनाचा गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. त्यांना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आदित्य व हिमांशूची १० ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली आहे.

# दोघांचं एकाच मुलीवर प्रेम; धारदार शस्त्राने एकाला संपवलं

**वर्धा :** वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहरात प्रेमप्रकरणातून उद्भवलेल्या वादातून एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. ही धक्कादायक घटना आर्वी शहराच्या मध्यवर्ती गांधी चौकात घडली असून, या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. मृत व्यक्तीचं नाव सलीम सबदर शा (वय ३०, रा. संजय नगर, आर्वी) असं असून, पोलिसांनी निखिल बुरे (रा. हरदोली) या तरुणास अटक केली आहे.प्राथमिक माहितीनुसार, सलीम आणि निखिल या दोघांमध्ये एका तरुणीवरून गेल्या काही महिन्यांपासून वाद सुरू होता. दोघांनाही तीच मुलगी आवडत असल्यानं त्यांच्यामध्ये वैर निर्माण झालं होतं. याच प्रेम संबंधातून निर्माण झालेल्या वादाचे रूप काल थेट हाणामारीत बदललं. दुपारच्या सुमारास गांधी चौकात सलीम आणि निखिल यांच्यात पुन्हा वाद झाला. वाद चिघळताच निखिलने आपल्याजवळील धारदार शस्त्राने सलीमवर वार केले. या हल्ल्यात सलीम गंभीर जखमी झाला. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने त्याला रुग्णालयात दाखल केलं. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केलं.घटनेची माहिती मिळताच आर्वी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. आरोपी निखिल बुरे याला अल्पावधीतच ताब्यात घेण्यात आलं असून, त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.



या घटनेमुळे आर्वी शहरात संतापाची लाट उसळली आहे. गांधी चौक परिसरात काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण असून, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी परिसरात बंदोबस्त वाढवला आहे. प्रेमसंबंधातून झालेल्या या हत्येनं आर्वी शहर हादरलं असून, पुन्हा एकदा युवकांमधील अस्थिर भावनांचा आणि रागाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# मो.शमीला मिळाले संघात स्थान!




**नवी दिल्ली :** येत्या रणजी ट्रॉफी हंगामाची सुरुवात १५ ऑक्टोबरपासून होणार आहे. या देशांतर्गत स्पर्धेच्या सुरुवातीपूर्वी सर्व राज्ये आपापल्या संघांची घोषणा करत आहेत. याच अनुषंगाने बंगाल संघाने २०२५-२६ रणजी ट्रॉफीसाठीही आपला संघ जाहीर केला आहे. या स्पर्धेसाठी त्यांनी अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीचा संघात समावेश केला आहे. शमी बऱ्याच काळापासून भारतीय कसोटी संघाबाहेर आहे आणि या स्पर्धेत चांगली काम गिरी करून पुनरागमन करण्याचा प्रयत्न करत आहे.

अभिमन्यू ईश्वरन आगामी रणजी ट्रॉफी हंगामात बंगालचे नेतृत्व करेल. देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या ईश्वरनला ही म हत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. याचा अर्थ शमी या हंगामात ईश्वरनच्या नेतृत्वाखाली खेळताना दिसेल. वेगवान गोलंदाज आकाश दीपलाही संघात स्थान देण्यात आले आहे. या दोन खेळाडूंच्या समावेशामुळे बंगालचा गोलंदाजी विभाग लक्षणीयरीत्या मजबूत होताना दिसत आहे. याव्यतिरिक्त, यष्टिरक्षक-फलंदाज अभिषेक पोरेलची उपकर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मोहम्मद शमीचा भारतासाठी शेवटचा सामना या वर्षी मार्चमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये होता. हा स्पर्धेतील शेवटचा सामना होता, जिथे भारताने न्यूझीलंडला हरवले. तेव्हापासून तो सातत्याने टीम इंडियामधून बाहेर आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेसाठीही निवडकर्त्यांनी त्याला दुर्लक्षित केले होते. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी एकदिवसीय आणि टी-२० मालिकेसाठीही त्याला दुर्लक्षित केले गेले आहे. तो टीम इंडियामध्ये कधी परतू शकेल हे पाहणे मनोरंजक असेल.

### रणजी ट्रॉफीसाठी बंगालचा संघ

अभिमन्यु ईश्वरन (कर्णधार), अभिषेक पोरेल, सुदीप कुमार घरामी, अनुस्तुप मजूमदार, सुदीप चटर्जी, सुमंत गुप्ता, सौरभ कुमार सिंह, विशाल भाटी, मोहम्मद शमी, आकाश दीप, सूरज सिंधू जायसवाल, शाकिर हबीब गांधी, इशान पोरेल, काजी जुनैद सैफी, राहुल प्रसाद, सुमित मोहंता और विकास सिंह.

या रणजी ट्रॉफी हंगामासाठी बंगालला एलिट ग्रुप सी मध्ये स्थान देण्यात आले आहे. या गटात गुजरात, हरियाणा, आर्मी, रेल्वे, त्रिपुरा, उत्तराखंड आणि आसाम या संघांचा समावेश आहे. बंगाल १५ ऑक्टोबर रोजी ईडन गार्डन्सवर उत्तराखंडविरुद्धच्या सामन्याने आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. त्यानंतर २५ ऑक्टोबरपासून गुजरातविरुद्ध आणखी एक होम मॅच होईल. आगामी रणजी ट्रॉफीमध्ये ३८ संघ असतील: एलिट डिव्हिजनमध्ये ३२ (चार गट) आणि प्लेट डिव्हिजनम ध्ये सहा. प्रत्येक एलिट ग्रुपमधील अव्वल दोन संघ क्वार्टरफायनलसाठी पात्र ठरतील, तर चार प्लेट संघ आपापल्या श्रेणींमध्ये बाद फेरीत प्रवेश करतील.

## आयसीसी कसोटी क्रमवारीत यशस्वी जैस्वालचे नुकसान



**नवी दिल्ली :** आयसीसीने कसोटी क्रिकेटम धील नवीन क्रमवारी नुकतीच प्रसिद्ध केली आहे. बऱ्याच कालावधीनंतर या क्रमवारीत बदल दिसून येत आहेत. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील कसोटी मालिकेदरम्यान आयसीसीने ही नवीन क्रमवारी जाहीर केली आहे. पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय सलामी फलंदाज यशस्वी जैस्वाल यांना धावा करण्यात अपयश आल्यामुळे, त्याला क्रमवारीत नुकसान झाल्याचे दिसत आहे. तथापि, अव्वल १० फलंदाजांमध्ये फार मोठे फेरबदल झालेले नाहीत.

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पहिली कसोटी टीम इंडियाने जिंकली. दुसरी कसोटी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर १० ऑक्टोबर पासून खेळली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर आयसीसीने कसोटीची नवीन क्रमवारी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे, ही क्रमवारी २ ऑक्टोबरपर्यंत अद्ययावत (अपडेट) करण्यात आली आहे; त्यामुळे भारत विरुद्ध वेस्ट इंडिज मालिकेतील सर्व आकडेवारी यात समाविष्ट नसावी. असे असूनही, इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूट याने आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. भारताचा सलामी फलंदाज यशस्वी जैस्वालला या क्रमवारीतील बदलामुळे नुकसान झाले आहे. तो दोन स्थानांनी घसरून सातव्या क्रमांकावर पोहचला आहे. त्याचे रेटिंग (७७९) कमी झाले आहे. ऋषभ पंत पूर्वीप्रमाणेच ७६१ रेटिंगसह आठव्या स्थानावर आहे, तर न्यूझीलंडचा डॅरिल मिचेल ७४८ रेटिंगसह नवव्या क्रमांकावर आहे. इंग्लंडचा बेन डकेट ७४७ रेटिंगसह दहाव्या स्थानावर कायम आहे.

## द.आफ्रिकेविरुद्ध भारताची आज अग्निपरीक्षा

### स्मृती-हरमनप्रीत-जेमिमाकडून भरीव खेळ साकारणार का?

**विशाखापट्टणम :** 'आयसीसी' महिला वन-डे विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने २ सामन्यांत २ विजय मिळवून गुणतालिकेत दुसरे स्थान मिळवले असले, तरी अव्वल फळीतील फलंदाजांच्या निराशाजनक कामगिरीमुळे संघासमोर चिंतेची छटा आहे. भारतीय महिला संघाची आज दक्षिण आफ्रिकेविरुद्ध साखळी लढत होत असून, येथे प्रामुख्याने स्मृती मानधना, कर्णधार हरमनप्रीत कौर आणि जेमिमाह रॉड्रिग्स या त्रिकुटाकडून अधिक आक्रमक खेळाचे प्रदर्शन अपेक्षित आहे. या लढतीला दुपारी ३ पासून प्रारंभ होईल.

दक्षिण आफ्रिकेसारख्या अधिक सक्षम संघासमोर हीच परिस्थिती पुन्हा उद्भवल्यास भारतासाठी ती आपत्तिमय ठरू शकते. त्यामुळे या महत्त्वाच्या लढतीत भारताच्या या स्टार त्रयीकडून भरीव योगदानाची संघाला नितांत गरज आहे. या सामन्यात विजय न मिळाल्यास भारताचे गुणतालिकेतील दुसरे स्थान धोक्यात येईल, तसेच १२ ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱया अंतिम साखळी सामन्यापूर्वी संघावर अतिरिक्त दबाव येईल.

अष्टपैलूंच्या कामगिरीचे सकारात्मक पैलू

भारतीय व्यवस्थापनासाठी एक सकारात्मक बाब म्हणजे, स्टार फलंदाजांच्या मोठ्या योगदानाशिवायही संघाने विजय मिळवला आहे. ही बाब संघातील अनेक 'मॅच-विनर्स'च्या अस्तित्वाचा संकेत देते. परंतु, दक्षिण आफ्रिका किंवा ऑस्ट्रेलियासारख्या अव्वल संघांविरुद्ध 'चांगल्या' आणि 'विजयी' धावसंख्येतील फरक मानधना, हरमनप्रीत आणि रॉड्रिग्स यांच्या बॅटमधून निघणाऱया धावांवर अवलंबून असेल, हे व्यवस्थापन निश्चितपणे मान्य करेल.



### दक्षिण आफ्रिकन संघ बहरात

दक्षिण आफ्रिकेने न्यूझीलंडविरुद्ध ६ गडी राखून विजय मि ळवत उत्कृष्ट पुनरागमन केले आहे. शतकवीर ताझमिन ब्रिट्स आणि अनुभवी सुने लूस पुन्हा फॉर्मात आल्या आहेत. कर्णधार लॉरा वोलव्हार्ड्ट आणि अनुभवी मरिझान कॅप व अनेके बॉश यांच्याकडूनही संघाला मोठ्या योगदानाची अपेक्षा असेल. नॉनकुलुलेको म्लाबा, अयाबोंगा खाका, कॅप, मासाबाटा क्लास आणि क्लो ट्रायॉन या अनुभवी गोलंदाजी फळीने आपला अनुभव पणाला लावल्यास, भारतीय फलंदाजीसाठी हे आव्हान कठीण असेल.

## वैभवचा ऑस्ट्रेलियात धमाका; छक्क्यांचा पाडला पाऊस!




**नवी दिल्ली :** आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील भारतीय अंडर-१९ संघाने ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाऊन यजमान संघाविरुद्ध तीन युवा एकदिवसीय आणि दोन युवा कसोटी सामने खेळले. सर्वांच्या नजरा पुन्हा एकदा १४ वर्षीय भारतीय खेळाडू वैभव सूर्यवंशीच्या कामगिरीवर होत्या, ज्याने दोन्ही मालिकांमध्ये आपल्या फलंदाजीच्या कौशल्याने सर्वांना प्रभावित केले. वैभवने युवा कसोटी मालिकेत केवळ शतकच केले नाही तर षटकार मारण्याच्या बाबतीत दोन्ही संघांच्या खेळाडूंमध्ये अव्वल स्थानावर आहे.

ऑस्ट्रेलियन अंडर-१९ संघाविरुद्ध वैभव सूर्यवंशीच्या कामगिरीबद्दल बोलायचे झाले तर, त्याने तीन युवा एकदिवसीय मालिकेत तीन डावांमध्ये एकूण १२४ धावा केल्या, ज्यामध्ये एका अर्धशतकाचा समावेश आहे. वैभवचा स्ट्राइक रेट ११२.७२ होता आणि त्याने १२ चौकार आणि ९ षटकारही मारले. युवा कसोटी मालिकेतील वैभव सूर्यवंशीच्या कामगिरीबद्दल बोलायचे झाले तर, त्याने तीन डावांमध्ये फलंदाजी केली आणि एका शतकासह ४४.३३ च्या सरासरीने एकूण १३३ धावा केल्या. या काळात त्याने ११ चौकार आणि ९ षटकारही मारले. अशाप्रकारे, वैभवने दोन्ही मालिकांमध्ये सहा डावांमध्ये फलंदाजी केली आणि अंदाजे ४२ च्या सरासरीने एकूण २५७ धावा केल्या. त्याने १८ षटकारही मारले.

राजस्थान रॉयल्सकडून खेळताना आयपीएल २०२५ च्या हंगामात वैभव सूर्यवंशीच्या शतकाने जागतिक क्रिकेटमध्ये खळबळ उडाली आहे. वैभवने आतापर्यंत त्याच्या युवा एकदिवसीय आणि कसोटी मालिकेतील कारकिर्दीत तीन शतके आणि तीन अर्धशतके झळकावली आहेत. आगामी भारतीय स्थानिक क्रिकेट हंगाम वैभवसाठी महत्त्वाचा असेल आणि रणजी ट्रॉफीमध्ये त्याच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष असेल.

# रेड चिलीज, Netflix ला हायकोर्टाची नोटीस

**मुंबई :** शाहरुख खानच्या रेड चीलीज एंटरटेनमेंट निर्मित आणि नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या 'Bads of Bollywood' या डॉक्युमेंटरी सिरीजवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या मालिकेत स्वतःची प्रतिमा चुकीच्या पद्धतीने दाखविल्याचा आरोप करत माजी एनसीबी अधिकारी समीर वानखेडे यांनी दिल्ली हायकोर्टात याचिका दाखल केली होती. ही याचिका स्वीकारत दिल्ली हायकोर्टाने रेड चीलीज आणि नेटफ्लिक्सला नोटीस बजावली आहे. न्यायालयाने सर्व पक्षकारांना येत्या ७ दिवसांत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

'Bads of Bollywood' या सिरीजमध्ये बॉलिवूडमधील काही वादग्रस्त प्रकरणांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यात आर्यन खान ड्रग्ज केसचाही उल्लेख आहे, ज्यात समीर वानखेडे हे तपास अधिकारी होते. याच प्रकरणामुळे शाहरुख खानच्या रेड चीलीज कंपनीचा या सिरीजशी संबंध असल्याने आता प्रकरण अधिकच गाजत आहे.

नेटफ्लिक्स आणि रेड चीलीजला नोटीस जारी करण्यात आली असून येत्या ७ दिवसांत सर्व पक्षकारांनी उत्तर द्यावं, असे दिल्ली हायकोर्टाने आदेश दिले आहेत. समीर वानखेडे यांनी शोचे निर्माता




यांच्यावर मानहानीचा दावा केला होता. आपली प्रतिमा चुकीच्या पद्धतीनं दाखविली गेली. यामुळे तपास यंत्रणेच्या मनोबलावर परिणाम होईल, असे म्हटले होते. वानखेडे यांनी आपल्या याचिकेत म्हटलं आहे की, या मालिकेत त्यांच्या भूमिकेचे चुकीचे चित्रण करण्यात आले असून त्यातून जनतेमध्ये त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न झाला आहे. दरम्यान, वानखेडे यांच्या याचिकेवर पुढील सुनावणी ३० ऑक्टोबरला होणार आहे. कोर्टाने म्हटलं आहे की, इतर्व पक्षांनी आपले उत्तर लेखी स्वरूपात ७ दिवसांत सादर करावे, त्यानंतर पुढील आदेश देण्यात येतील.

## काय आहे प्रकरण ?

समीर वानखेडे यांनी ड्रग्ज प्रकरणात आर्यन खानला क्रूझवरून ताब्यात घेतले होते. त्यानंतर आर्यनने बॅड्स ऑफ बॉलीवूड या सीरीजमधून दिग्दर्शनात पाऊल ठेवले. या सीरीजमध्ये समीर वानखेडेंशी संबंधित काही दृश्ये आहेत, ज्यामुळे सोशल मीडियावर खूप चर्चा झाली. त्यातील काही सीन्स सोशल मीडियावर खूप व्हायरल झाले, ज्यामुळे समीर वानखेडे यांनी संताप व्यक्त केला. यानंतर समीर वानखेडे यांनी नेटफ्लिक्सच्या 'बॅड्स ऑफ बॉलिवूड' या वेबसीरीज विरोधात दिल्ली हायकोर्टात याचिका दाखल केली होती. त्यांनी नेटफ्लिक्स आणि शाहरुख खानची कंपनी रेड चिलीज एंटरटेनमेंटच्या विरोधात २ कोटींची मानहानीची याचिका दाखल करून नुकसान भरपाई मागितली होती. पण, कोर्टाने आर्यन खानची सीरीज 'बॅड्स ऑफ बॉलिवूड' विरुद्ध दाखल केलेल्या २ कोटी रुपयांच्या मानहानीच्या खटल्यात त्यांना तात्काळ अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला होता.

# हर्षवर्धन राणे-सोनमच्या वेड्या प्रेमाचा अंत?




मुंबई - बॉलिवूडमध्ये पुन्हा एकदा रोमान्स आणि थरारक कथेने परिपूर्ण चित्रपट येतोय. 'एक दीवाने की दीवानियत' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच रिलीज झाला असून त्यात हर्षवर्धन राणे आणि सोनम बाजवा यांची इमोशनल केमिस्ट्री पाहायला मिळते. ट्रेलर रिलीज होताच सोशल मीडियावर जबरदस्त क्रेझ निर्माण केली आहे.

चित्रपटाच्या ट्रेलरची सुरुवात एका रहस्यमय आणि गूढ प्रेमकथेनं होते. प्रेम, वेडेपणा, आसक्ती आणि सूड यांची गुंफण असलेली ही कथा पाहणाऱ्याला थक्क करते. हर्षवर्धन राणे एका वेड्या प्रेमात अडकलेला, तीव्र भावनांनी भारलेला प्रियकर साकारत आहे. सनम तेरी कसम फेम अभिनेता हर्षवर्धन राणे आपला आगामी चित्रपट 'एक दीवाने की दीवानियत'मुळे चर्चेत आहे. तो पुन्हा एकदा लव्ह स्टोरीमधून प्रेक्षकांसमोर येतोय, ज्यामध्ये प्रेम आणि द्वेष दोन्ही दिसेल. त्यांचा चित्रपट 'एक दीवाने की दीवानियत'चा ट्रेलर रिलीज झाला आहे. चित्रपटाने ट्रेलरमध्ये अशी प्रेम कहाणी दाखवलीय, जे पाहून फॅन्स उत्सुक आहेत.

हर्षवर्धन राणेने आपल्या सोशल मीडिया हँडलवर चित्रपटाचा ट्रेलर रिलीज केला आहे. कॅप्शन देखील लिहिलीय - 'इतिहास का मैं पहला रावण हूं जो खुद सीता को घर छोड़ कर आएगा. #EkDeewaneKiDEEWANIYAT ट्रेलर अभी जारी...'

या दिवाळीत चित्रपटगृहामध्ये २१ ऑक्टोबर, २०२५ रोजी ट्रेलरच्या आधी चित्रपटाचा टीझरआणि गाणी खूप पसंतीस उतरले आहे. टायटल ट्रॅकसह एकूण ३ गाणे आतापर्यंत रिलीज झाले आहेत. तिन्हीही गाणी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली असून चित्रपटाची क्रेझ आहे.

हर्षवर्धन राणे यापूर्वी सनम तेरी कसम, तारा वर्सेस बिलाल यांसारख्या चित्रपटांतून चर्चेत आला होतो. तर सोनम बाजवा ही पंजाबी आणि हिंदी सिनेसृष्टीतील सर्वाधिक लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. या दोघांची ऑन-स्क्रीन जोडी प्रेक्षकांना खूपच आवडली आहे. मिलाप जावेरी दिग्दर्शित या चित्रपटाचा सामना थामाशी होणार आहे. तामा चित्रपटात आयुष्मान खुराना -रश्मिका मंदाना यांच्याशी होईल. 'थामा' मॅडॉक हॉरर-कॉमेडी युनिवर्सचा भाग आहे.



# आधी ६० कोटी रुपये जमा करा, नंतर परदेशात जा



**मुंबई :** शिल्पा शेट्टी आणि तिचा व्यावसायिक पती राज कुंद्रा यांना मुंबई उच्च न्यायालायाने सुनावले. आधी ६० कोटी जमा करा, नंतर परदेशात जा, असे निर्देश कोर्टाने या कपलला दिले आहेत. शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्या ६० कोटी रूपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. ही फसवणूक त्यांच्या बेस्ट डील टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत गुंतवणूक डील संदर्भातील आहे. या प्रकरणी पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने जवळपास साडे चार तास शिल्पा शेट्टीची चौकशी केली. या प्रकरणामध्ये शिल्पाचे पती राज कुंद्रासह पाच लोकांचे जबाब नोंदवण्यात आला आहे. या कपलने कोर्टाकडे परदेशात जाण्यासाठी परवानगी मागितली होती. पण कोर्टाने ती नाकारली.

# दीपिकाने हिजाब घातल्याने सोशल मीडियावर ट्रोल..

**मुंबई :** बॉलिवूडमधील सर्वात प्रसिद्ध जोडप्यांपैकी एक असलेले दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंग हे सध्या चर्चेत आहेत. यावेळी, कारण मुस्लिमांच्या वेशात घालण्यात आलेला त्यांचा एक नवीन व्हिडिओ आहे. दीपिकाने हिजाब घातला आहे, तर रणवीर मोठी दाढी घातलेला दिसत आहे. हा चित्रपटातील दृश्य नाही; प्रत्यक्षात या जोडप्याने असा पोशाख घातला आहे. दोघांचा हा व्हिडिओ वेगाने व्हायरल होत आहे, अनेक लोक त्याचे कौतुक करत आहेत आणि काहीजण त्यांना ट्रोल करत आहेत.

दीपिका आणि रणवीरने त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर हा व्हिडिओ शेअर केला आहे, त्याला कॅप्शन दिले आहे, 'मेरा सुकून' हा व्हिडिओ ऑनलाइन व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये ते अबुधाबीच्या सुंदर ठिकाणांचे कौतुक करताना दिसत आहेत. हे जोडपे अबुधाबी पर्यटनाचा प्रचार करत आहे आणि हा व्हिडिओ त्या प्रयत्नांचा एक भाग आहे.

लोक आता त्यांच्या लूकवर कमेंट करत



आहेत. एका वापरकर्त्याने कमेंट सेक्शनमध्ये रणवीरच्या नेहमीच्या विचित्र फॅशनची खिल्ली उडवत लिहिले आहे की, 'कोणीतरी त्याला संग्रहालयात पाठवा, रणवीर नेहमीच विचित्र दिसतो.' दुसऱ्याने लिहिले, 'तो हिंदू असूनही हिजाब का घालतो?' तिसऱ्याने लिहिले, 'तुम्ही भारतीय संस्कृतीऐवजी इतर संस्कृतींचा प्रचार करत आहात का? दीपिका आणि रणवीरने हे करायला नको होते.

# जिजाऊ चरित्रातून मिळतात नैतिक आचरणाचे धडे : प्रमोद टाले

## जन्मोत्सवाच्या पूर्व संध्येला जिल्हा पत्रकार संघाकडून माँ जिजाऊंना मानवंदना

**जनसंचलन/बुलढाणा**

थोडा स्वार्थ बाजूला ठेवला तर महापुरुषांचे विचार पुढे नेल्या जाऊ शकतात. जिजाऊ माँसाहेब, छत्रपती शिवाजी, महाराज छत्रपती संभाजी महाराज यांनी इतिहास घडविला. कठीण काळात संघर्ष करणाऱ्या जिजाऊ होणे सोपे नाही. या महापुरुषांच्या जीवनातून आपण आज काय घ्यावे ? असा प्रश्न आज उभा राहतो. तेव्हा जिजाऊ सारखे शुद्ध नैतिक आचरण व शिवबा व संभाजीराजांसारखे निस्वार्थ जीवन जगण्याचे धडे आपण घेऊ शकतो असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक प्रमोद टाले यांनी आज केले. जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने जिजाऊ जयंतीच्या कार्यक्रमात ते बोलत होते. येथील पत्रकार भवन येथे जिजाऊ जयंतीच्या पूर्व संध्येला इतिहास अभ्यासक प्रमोद टाले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत होते. कार्यक्रमास अतिथी व सत्कार मूर्ती म्हणून नवनिर्वाचित नगरसेवक प्रा.सुनील सपकाळ, उदय देशपांडे, मोहन पऱ्हाड सत्कार मूर्ती म्हणून उपस्थित होते. तर पत्रकार राजेश डिडोळकर, सुभाष लहाने, रवींद्र गणेशे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम जिजाऊ पूजन करण्यात आले. त्यानंतर जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना प्रमोद टाले म्हणाले, इतिहासाची साधने मुळात कमी आहेत. जिजाऊना महत्व द्यायला आजही एक वर्ग तयार नाही. तेच राजे लखुजी जाधव यांच्या बाबतही झाले. संपूर्ण निजामशाही राजे लखुजी यांच्यावर अवलंबून होती. येवढे मातब्बर सरदार ते होते. स्वतःचा किल्ला बांधण्याचे काम त्यांनी हाती घेतले. तत्कालीन परिथितीमुळे तो पूर्ण होऊ शकला नाही. काळा कोट म्हणून तो आजही प्रसिद्ध आहे. मुघल सत्तेखाली जनता भरडली जात होती. गुलामगिरी लादली गेली, प्रजा त्रस्त झाली त्यावेळी स्वराज्यचे पाहिले स्वप्न लखुजी राजे यांनी पाहिले. पुढे जिजाऊ यांनी शिवरायांच्या माध्यमातून हे काम पूर्ण केले असे दिसते. ही कडी समजून घेतली पाहिजे. पण यावर संशोधन झाले नाही ते झाले पाहिजे असे सांगून त्यांनी मातृतीर्थ सिंदखेड राजाच्या विकासाबाबत उदासीनतेवर भाष्य केले व जिजाऊ चरीत्राचे अनेक पैलू उलगडले. यावेळी उदय देशपांडे व मोहन पऱ्हाड, पत्रकार सुभाष लहाने, राजेश डिडोळकर, गणेशे सर यांनी समयोचित विचार मांडले. संचलन राम हिंगे तर आभार गणेश निकम केळवदकर यांनी मानले. यावेळी सुरेखा सावळे, वैशाली राजपूत, प्रतिभा भुतेकर, पत्रकार सर्वश्री गणेश निकम, नितीन शिरसाट, जितेंद्र कायस्थ, भानुदास लकडे, निनाजी भगत, प्रेमकुमार राठोड, रहेमत अली शाह, सुनिल मोरे, गणेश सोनुने, अजय राजगुरे, पवन सोनारे, शौकत शहा, विलास खंडेराव, ईसरार देशमुख, अजय काकडे, तुषार यंगड, आकाश भालेराव, आकाश गायकवाड, माजी नगरसेवक अरविंद होंडे, प्रा.ज्ञानेशवर खांडवे, लक्ष्मण ठाकरे यांच्यासह इतरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

### विकासाठी लोकसंग्रहकाकडे आकर्षित झालो : प्रा.सुनील सपकाळ

**सत्काराला उत्तर देताना सुनील सपकाळ यांनी बुलढाण्याचा होत असलेला विकास, यासाठी आ.संजय गायकवाड यांची धडपड पाहून विरोधकांना आपले करणाऱ्या लोकसंग्रहाकाकडे आकर्षित झाल्याचे सांगितले. आ.संजय गायकवाड यांचा कट्टर विरोधक असतांना सुध्दा त्यांनी मला नगरसेवक होण्याची संधी दिली. त्यामुळे विरोधकाला आपलंस करण्याचे कसब आहे.**



### आपण सुगंध पसरविण्याचे काम करूया : रणजीतसिंग राजपूत

**बुलढाणा नगर पालिकेत स्वीकृत सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल सुनील सपकाळ, उदय देशपांडे, मोहन पऱ्हाड यांचा सत्कार जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजितसिंग राजपूत व सहकाऱ्यांनी केला. सुगंध पसरविण्याचे काम आपण करूया. बुलढाण्याच्या विकासाचे नवे पर्व सुरू झाले आहे. नवनिर्वाचित नगरसेवक वैचारिक भूमिकेचे असून आपण जेथे झाल तेथे सुगंध पेराल. बुलढाण्याचा सुसंस्कृतपणा टिकविण्याचे काम आपल्या हातून व्हावे अशी अपेक्षा रणजीतसिंग यांनी बोलतांना व्यक्त केली व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

---

# महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक अधिकारी कर्मचारी असोसिएशन जिल्हाअध्यक्षपदी- रियाज शेख

**जनसंचलन/चिखली**



महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक अधिकारी कर्मचारी असोसिएशन, मुंबई जिल्हा शाखा बुलढाणा यांची नवीन जिल्हा कार्यकारिणी गठीत होऊन विविध पदांवर सक्षम, अनुभवी व समाजाभिमुख नेतृत्वाची निवड करण्यात आली आहे, ही बुलढाणा जिल्ह्यासाठी अत्यंत आनंदाची व अभिमानाची बाब आहे. या कार्यकारिणीत बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी मा. रियाज शेख यांची निवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जिल्हा कार्याध्यक्षपदी शेख अकील शेख इब्राहिम (उपशिक्षणाधिकारी, प्राथमिक जिल्हा परिषद बुलढाणा), जिल्हा सचिवपदी सय्यद अकबर सय्यद मोहम्मद, सहसचिवपदी सय्यद रफिक सय्यद रशीद यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेच्या उपाध्यक्षपदी मा. उमेश जैन उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा, तोफिक अहमद अब्दुल रफिक, इब्राहिम खान, हबीबुल्ला खान, आगामीया शाह, बिस्मिल्ला शेख, प्रेमानंद वानखेडे व रसोद्दीन काजी यांची निवड करण्यात आली आहे. ज्येष्ठ मार्गदर्शक म्हणून शेख चांद शेख गुलाब साहेब, वासिक नवेद साहेब यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संघटकपदी, संगीता कासारे, भावना चुडीवाल, अजीज सर,प्रा. तनजीम हुसेन यांची निवड करण्यात आली असून, खजिनदारपदी सय्यद फुरकान सय्यद मर्दान व सतीश जगदीश बेलोकार यांना जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच विधी सल्लागारपदी एडवोकेट शेख सलीम शेख मोहम्मद, एडवोकेट शेख सादिक शेख मोबीन यांची निवड करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीतील सर्व पदाधिकारी हे अनुभवी, कर्तव्यनिष्ठ व अल्पसंख्यांक अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत नेहमीच संवेदनशील भूमिका घेणारे असल्याने, त्यांच्या नेतृत्वाखाली संघटना अधिक मजबूत होईल, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले जातील आणि संघटनात्मक कार्याला नवी दिशा मिळेल, असा सर्वांना विश्वास आहे.

# पालकमंत्री ना.मकरंद पाटील आज मातृतिर्थ सिंदखेडराजात



**जनसंचलन/बुलढाणा**

राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांच्या जन्मोत्सवानिमित्त जिल्ह्याचे पालकमंत्री ना.मकरंद पाटील आज सोमवार, दि.१२ जानेवारी रोजी मातृतिर्थ सिंदखेडराजा दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते सकाळी ११ वाजता राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेबांच्या जन्मस्थानी भेट देवून अभिवादन करणार आहेत. त्यांच्या दौऱ्यानुसार पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांचे सिंदखेड राजा नगरपरिषद येथे आगमन, सकाळी ११ वाजता राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांचे जन्मस्थान आगमन व राखीव तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कक्षास भेट, दुपारी १२ वाजता राष्ट्रमाता माँ जिजाऊ सृष्टीस भेट, दुपारी १२.३० वाजता ॲड. नाझेर काझी यांच्या निवासस्थानी भेट, दुपारी १.३० हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गातील सिंदखेडराजा इंटरचेंज फेज क्र ७ येथे उभारण्यात येणाऱ्या बालशिवबासह राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब पुतळ्याच्या जागेची पाहणी करणार आहेत. त्यानंतर ते सिंदखेडराजा येथून साताराकडे प्रस्थान करतील.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कायदा मोडणाऱ्यांना माफी नाही - जिल्हा पोलिस अधिक्षक निलेश तांबे...

## विविध गुन्ह्यांत जवळपास ६० कोटींचा मुद्देमाल जप्त

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कायदा मोडणाऱ्यांना माफी नाही अशी भूमिका स्वीकारत बुलढाणा पोलिसांनी सरत्या वर्षात कारवाया केल्या आहेत. दरम्यान, २०२६ मध्येही प्रशासनात अधिक सुधारणा करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. २०२५ च्या सुरुवातीलाच आक्रमक कारवाया करत गंभीर गुन्हे, अवैध धंदे, संघटित गुन्हेगारी, सायबर फसवणूक आणि वाहतूक नियमभंग यांविरोधात राबविण्यात आलेल्या बहुआयामी मोहिमेत जवळपास ६० कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही माहिती नीलेश तांबे यांनी १० जानेवारी रोजी प्रसारमाध्यमांशी आयोजित अनौपचारिक वार्तालाप कार्यक्रमात दिली. यावेळी त्यांच्यासमवेत अपर पोलिस अधीक्षक मोहन गायकवाड, परिवीक्षाधीन पोलिस अधीक्षक अजित प्रसारमाध्यमांशी वार्तालाप करताना जिल्हा पोलीस अधिक्षक निलेश तांबे. सिंग, एलसीबीचे पोलिस निरीक्षक सुनील अंबूलकर प्रामुख्याने उपस्थित होते. पोलिस अधीक्षक तांबे यांनी स्पष्ट केले की, जिल्ह्यात कायद्याचा धाक निर्माण करणे आणि सामान्य नागरिकांना सुरक्षित वातावरण देणे हा प्रशासनाचा मुख्य उद्देश आहे. त्यानुसार, सन २०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण सुमारे १० टक्क्यांनी घटले आहे. खून, दरोडे, जबरी चोरी, घरफोडी यांसारख्या गुन्ह्यांत घट दिसून आली असून, दाखल झालेल्या बहुतांश गुन्ह्यांचा छडा लावण्यात पोलिसांना यश मिळाले आहे.



अवैध दारूनिर्मिती व वाहतूक, १० टक्क्यांनी घटले २०२५ मध्ये गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण मटका जुगार, सट्टा, वाळूतस्करी, बेकायदा धंदे यांच्यावरही मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली. या कारवायांत हजारो गुन्हे दाखल करून कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशेषतः ग्रामीण फोफावलेल्या भागात अवैध दारूच्या अड्ड्यांवर धाडी टाकून त्यांचे समूळ उच्चाटन करण्यात आले. वाहतूक शाखेमार्फतही कठोर कारवाई करण्यात आली. मद्यधुंद वाहनचालक, विनाहेल्मेट, विनापरवाना व वेगमर्यादा ओलांडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करत मोटार वाहन कायद्यांतर्गत मोठ्या प्रमाणावर दंड वसूल करण्यात आला.

# घरासमोरून सोयाबीनचे कट्टे लंपास गुन्हा दाखल

जनसंचलन/ देऊळगाव राजा

देऊळगाव राजा तालुक्यातील भिवगाव येथे घरासमोर ठेवलेले सोयाबीनचे कट्टे अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना ११ जानेवारीच्या पहाटे घडली. या प्रकरणी देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भिवगाव येथील शेतकरी ओम मधुकर चव्हाण यांनी शेतातील सोयाबीन कट्ट्यांमध्ये भरून घरासमोरील ओट्यावर ठेवले होते. थंडीचे प्रमाण अधिक असल्याने घटनेच्या रात्री फिर्यादी व त्यांचे मित्र घराबाहेर शेकोटी करून बसले होते. त्यानंतर सर्वजण झोपण्यासाठी आपापल्या घरी गेले. १लाख ८० हजार रुपये सोयाबीनची किंमत असल्याचा अंदाज सकाळी उठून पाहिले असता घरासमोरील ओट्यावर ठेवलेल्या एकूण ७२ पोत्यांपैकी ७० पोते, अंदाजे १ लाख ८० हजार रुपयांची किंमत असलेले सोयाबीन अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे निदर्शनास आले. शेतकऱ्यांच्या पशुधनासह आता साठवून ठेवलेल्या शेतीमालावरही चोरटे डल्ला मारत असल्याने शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण आहे. पसरले अतोनात कष्ट करून पिकवलेल्या मालावर अशा प्रकारे चोरी होत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास देऊळगाव राजा पोलिस करीत आहेत.

# शेलूदनजीक कार अपघातात एक ठार

जनसंचलन/ चिखली

कारवरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्यावर उलटून झालेल्या अपघातामध्ये एक जण ठार तर तिघे गंभीररित्या जखमी झाले आहेत. ही घटना चिखली-खामगाव मार्गावरील शेलूद फाट्यानजीक शुक्रवारी (दि. ९) सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास घडली. या अपघातात रितेश समाधान लहाने (१७, रा. काटोळा, ता. चिखली) या युवकाचा जागीच मृत्यू झाला आहे. रितेश लहानेसह अन्य तिघेजण (जीजे ०५-सीक्यू-४७९६) या कारमधून प्रवास करत होते. वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्यावर कार उलटली. त्यानंतर रस्त्याच्या कडेला जाऊन धडकली. यामध्ये रितेश लहाने या युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर वाहनातील इतर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतल्याने रस्त्यावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

# डोणगावमध्ये भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण मोहीम सुरू...

जनसंचलन/मेहकर

गेल्या काही दिवसांपासून डोणगाव शहरात भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला होता. यामुळे लहान मुले, महिला आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. कुत्र्यांच्या झुंडीने नागरिकांवर हल्ल्याचे प्रकार देखील घडले होते. या समस्येबाबत ग्रामस्थांनी ग्रामपंचायत व पंचायत समितीकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी डोणगाव ग्रामपंचायतीला भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण आणण्यासाठी आदेश दिले. मोहीम आणि नागरिकांचा प्रतिसाद त्यानुसार, डोणगाव ग्रामपंचायतीने भटक्या कुत्र्यांची धरपकड मोहीम



सुरू केली आहे. या मोहिमेमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही कारवाई महत्त्वाची असल्याचे मत व्यक्त होत आहे. यापूर्वीही लोकप्रतिनिधी व नागरिकांनी निवेदने देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले होते. दरम्यान, मोहीम सुरू झाल्यानंतर श्रेय घेण्याची चढाओढ सुरू असली तरी, शहराच्या सुरक्षिततेसाठी उचललेले पाऊल अधिक महत्त्वाचे आहे, असे मत नागरिक व्यक्त करत आहेत. यावेळी सरपंच शिवचरण आखाडे आणि उपसरपंच श्याम इंगळे स्वतः हजर राहून सफाई कामगारांच्या मदतीने कुत्र्यांना पकडण्याचे प्रयत्न करत होते.





दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८